भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१२-१३/३६
डीएनबीएस (पीडी)सीसी क्र. २७७/०३.०२.००१/२००१२-१३ जुलै २, २०१२

प्रति,
सर्व अबँकीय वित्तीय कंपन्यांचे (अवशिष्ट अबँकीय कंपन्या व संकीर्ण अबँकीय कंपन्या सोडून)
अध्यक्ष/सीईओ

महोदय,

**महापरिपत्रक – "जून ३०, २०१२ पर्यंत सुधारित अधिसूचना अबँकीयवित्तीय कंपन्या - सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८"**

आपणास माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी, रिझर्व बँक अद्यावत केलेली परिपत्रके/अधिसूचना देत असते. अधिसूचना क्र.डीएफसी.११८/डीजी (एसपीटी) दि. जानेवारी ३१, १९९८ मधील सूचना, जून ३०, २०१२ पर्यंत अद्यावत केलेल्या सूचना खाली दिल्या आहेत. अद्यावत केलेली ही अधिसूचना रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही टाकण्यात आली आहे.

आपला विश्वासु

(सी. आर. सम्युक्था)
मुख्य महाव्यवस्थापक

अनुक्रमणिका


| परिच्छेद क्र. | विषय |
|---|---|
| भाग १ - प्रारंभिक | |
| १ | लधु शीर्षक व निदेशांची सुरुवात |
| २ | व्याख्या |
| भाग २ सार्वजनिक ठेवींचा स्वीकार | |
| ३ | म्युच्युअल बेनिफिट वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार करण्याबाबतचे निर्बंध |
| ४ | अबँकीय वित्तीय कंपन्यांद्वारे सार्वजनिक ठेवींचा स्वीकार केला जाण्यावरील निर्बंध |
| ५ | क्रेडिट रेटिंग खाली येणे |
| ६ | आधी स्वीकारलेल्या व परवानगीप्राप्त मर्यादेच्या अतिरिक्त असलेल्या सार्वजनिक ठेवी नियमित करणे. |
| ७ | व्याजदरावरील मर्यादा |
| ८ | दलालीचे प्रदान |
| ९ | सार्वजनिक ठेवीचे नूतनीकरण |
| १० | मुदतबाह्य (ओव्हरड्यु) सार्वजनिक ठेवींवरील व्याजाचे प्रदान |
| ११ | संयुक्त ठेव |
| १२ | सार्वजनिक ठेवी मागविण्याच्या अर्जाच्या फॉर्ममध्ये द्यावयाचा तपशील |
| १३ | जाहिरात आणि जाहितातीऐवजी द्यावयाचे निवेदन : |
| १४ | किमान लॉक-इन कालावधी आणि ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास करावयाची परतफेड |
| १५ | वादग्रस्त अबँकीय वित्तीय कंपनी नसलेल्या अबँकीय कंपनीद्वारा सार्वजनिक ठेवींचे पुनर्प्रदान |
| १६ | ठेवींसाठी रजिस्टर |
| विभाग ३ - विशेष तरतुदी | |
| संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट करावयाची माहिती | |
| मंजुरीप्राप्त प्रतिभूतींचा सुरक्षा-सांभाळ (सेफ कस्टडी) | |
| कर्मचा-यांची सुरक्षा ठेव | |
| रिझर्व बँकेला सादर करावयाच्या, ताळेबंद व लेखा, ह्यासह संचालकांचा व ऑडिटर्सचा अहवाल, नोट्स ऑन अकाऊंट्स व रिर्टन्सच्या प्रती सादर करणे | |
| ऑडिटरचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तरतुद | |
| भारतीय रिझर्व बँकेला सादर करावयाचे अहवाल | |
| नॉन-बँकिंग पर्यवेक्षण विभागाला सादर करावयाचे ताळेबंद, अहवाल इत्यादि | |
| काही प्रकारच्या अबँकीय वित्तीय कंपन्यांना हे निदेश लागु न होणे | |
| सूट | |
| नॉन बँकिंग वित्तीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, १९९८ चा भंग/उल्लंघन केले जाण्यामुळे केलेली किंवा करावयाची कारवाई वाचविणे | |
| परिच्छेद २(१) मध्ये निर्देशित केलेल्या कंपन्यांव्यतिरिक्त अन्य कंपन्यांना हे निदेश लागु होणे | |
| जोडपत्र | |

**भारतीय रिझर्व बँक**
**अ-बँकिय पर्यवेक्षण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**केंद्र - १, वर्ल्डट्रेड सेंटर**
**कफ परेड, कुलाबा**
**मुंबई - ४०० ००५**

**अधिसूचना क्र. डीएफसी.११८/डीजी(एसपीटी) - ९८ दि. जानेवारी ३१, १९९८**

भारतीय रिझर्व बँकेला सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक वाटत असलेल्याने आणि देशाच्या हितासाठी कर्ज प्रणालीचे नियंत्रण करण्यास बँकेला साह्य करण्यासाठी, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ जे, ४५ के, ४५ एल व ४५ एमए ने दिलेल्या अधिकारांचा आणि ह्याबाबत दिलेल्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन व अधिसूचना क्र.डीएफसी-११४/डीजी (एसपीटी)-९८ दि जानेवारी २, १९९८ मधील सूचनांचे दमन करुन, रिझर्व बँक, प्रत्येक अबँकीय वित्त कंपनीला पुढीलप्रमाणे निदेश देत आहे.

**भाग १ - प्रारंभिक**

**लधु शीर्षक व निदेशांची सुरुवात**

**१.** हे निदेश "अबँकीय वित्तीय कंपन्या-सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८" ह्या नावाने ओळखले जातील. ते ३१ जानेवारी १९९८ पासून अंमलबजावणीत येतील व ह्या निदेशांमधील सुरुवात होण्याच्या कोणत्याही तारखेचा संदर्भ ह्या तारखेशीच असेल.

**व्याख्या**

**२(१)** ह्या निदेशांच्या संदर्भात अन्यथा निर्देशित केलेले नसल्यास,-

(१अ) "ॲसेट फायनान्स कंपनी" म्हणजे, अशी एक वित्तीय संस्था की जिचा मुख्य उद्योग/व्यवसाय हा, पुढील प्रकारच्या उत्पादक/पूरक कार्यकृतींसाठी लागणाऱ्या प्रत्यक्ष मालमत्तांसाठी अर्थसहाय्य करण्याचा आहे, ऑटोमोबाइल्स, ट्रॅक्टर्स, लेथ मशीन्स, जनरेटर संच, अर्थ मूव्हिंग व मटेरियल हँडलिंग इक्विपमेंट्स (स्वतःच्याच ऊर्जेवर चालणारी) आणि सर्वसाधारण कामांसाठीची औद्योगिक यंत्रे. [१]

१) "ठेवीदार" म्हणजे, कंपनीकडे ठेव ठेवणारी कोणतीही व्यक्ती किंवा त्या ठेवीदाताचा वारस, कायदेशीर प्रतिनिधी, प्रशासक किंवा नेमलेली व्यक्ती (असायनी);

२) खोडून टाकण्यात आले आहे [२]

३) "मुक्त राखीव निधी" म्हणजे, शेअर प्रिमियम अकाउंटमधील एकूण शिल्लक, कॅपिटल व डिबेंचर्स रिडेंशन रिझर्वज् आणि कंपनीच्या ताळेबंदात दाखविलेला किंवा प्रकाशित केलेला, कोणताही अन्य राखीव निधी, जो नफा वाटपाद्वारे निर्माण केला गेला आहे, परंतु तो भविष्यातील एखाद्या जबाबदारीची परतफेड करण्यासाठी किंवा ॲसेट्सच्या मूल्यऱ्हासासाठी किंवा वाईट कर्जांसाठी निर्माण करण्यात आलेला नाही किंवा त्या कंपनीच्या ॲसेट्सचे पूनर्मूल्यांकन करुन निर्माण करण्यात आलेला नाही.

४) खोडण्यात आले आहे. [३]

५) "विमा कंपनी" म्हणजे. विमा अधिनियम, १९३८(१९३८ चा ४) च्या कलम ३ खाली पंजीकृत केलेली कोणतीही कंपनी.

६) "गुंतवणुक कंपनी" म्हणजे, जिचा मुख्य व्यवसाय सिक्युरिटीज् मिळविण्याचा आहे. अशी एक वित्तीय कंपनी.

७) "कर्जदायी सार्वजनिक वित्तीय संस्था" म्हणजे –

[१] अधिसूचना क्र. १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये स्थापित.
[२] अधिसूचना क्र. १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये खोडून टाकण्यात आले.
[३] अधिसूचना क्र. १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये खोडून टाकण्यात आले.

अ) कंपनीज अधिनियम, १९५६(१९५६ चा १) च्या कलम ४ अ मध्ये किंवा खाली विहित केलेली सार्वजनिक वित्तीय संस्था; किंवा
ब) राज्य वित्तीय, औद्योगिक किंवा गुंतवणुक निगम; किंवा
क) अनुसूचित वाणिज्य बँक; किंवा
ड) जनरल इन्शुअरन्स बिझिनेस (नॅशनलायझेशन) अधिनियम १९७२(१९७२ चा ५७)च्या कलम ९ च्या तरतुदींनुसार स्थापन झालेली जनरल इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया; किंवा
ई) रिझर्व बँकेने ह्याबाबत विहित केलेली अन्य कोणतीही संस्था.

८) “कर्ज कंपनी” म्हणजे, तिची स्वतःची कार्यकृती सोडून असलेल्या इतर कार्यकृतींसाठी, कर्जे किंवा अग्रिम राशी देऊन वितसहाय्य करण्याचा मुख्य व्यवसाय असलेली वित्तीय संस्था. ह्यात ॲसेट फायनान्स कंपनी समाविष्ट नाही. [४]

९) “म्युच्युअल बेनिफिट वित्तीय कंपनी” म्हणजे, कंपनीज अधिनियम १९५६ (१९५६ चा १) च्या कलम ६२० अ खाली केंद्र सरकारद्वारा अधिसूचित अशी कोणतीही वित्तीय कंपनी.

[५] [(९अ) “म्युच्युअल बेनिफिट कंपनी” म्हणजे कंपनीज अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम ६२० अ खाली अधिसूचित नसलेली व अबँकीय वित्तीय कंपनीचा व्यवसाय करणारी कंपनी,-

अ) ९ जानेवारी १९९७ रोजी.

ब) नक्त निज निधी आणि प्रिफरेंशियल शेअर भांडवल मिळून रु १० लक्षांपेक्षा कमी नसलेली आणि.

क) ९ जुलै १९९७ रोजी किंवा त्यापूर्वी ह्या बँकेकडे पंजीकरण प्रमाणपत्र देण्यासाठी अर्ज केलेली आणि.

ड) केंद्र सरकारने निधी कंपन्यांना कंपनीज अधिनियम, १९५६ च्या कलम ६३७ अ खाली दिलेल्या आवश्यतांचे पालन करणारी कंपनी]

१०) “नक्त निज निधी” म्हणजे, रिझर्व बँक अधिनियम १९३४(१९३४ चा २) च्या कलम ४५-आयए खाली व्याख्या केल्यानुसार, इक्विटीमध्ये अनिवार्यतेने रुपांतरित असलेल्या, पेडअप प्रिफरन्स शेअर्स सह असलेला नक्त निजनिधी.

११) “अबँकीय वित्तीय कंपनी” म्हणजे, एखादी कर्ज कंपनी गुंतवणुक कंपनी किंवा ॲसेट फायनान्स कंपनी[६] किंवा म्युच्युअल बेनिफिट फायनान्शियल कंपनी असलेली केवळ अबँकीय असलेली संस्था.

१२) “सार्वजनिक ठेव” म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ आय (बीबी) खाली व्याख्या केलेली ठेव. ह्यात पुढील रकमांचा समावेश होत नाही-

अ) केंद्र सरकार किंवा राज्य सरकार कडून मिळालेली कोणतीही रक्कम किंवा कोणत्याही स्त्रोतामधून मिळालेली व केंद्र सरकार किंवा राज्य सरकारद्वारा तिच्या परतफेडीची हमी दिली असलेली कोणतीही रक्कम किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरण किंवा विदेशी सरकारकडून किंवा इतर कोणताही विदेशी नागरिक, प्राधिकरण किंवा व्यक्तीकडून मिळालेली कोणतीही रक्कम.
ब) इंडस्ट्रियल डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९६४(१९६४ चा १८) खाली स्थापन झालेली इंडस्ट्रियल डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया, किंवा लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन अधिनियम, १९५६(१९५६ चा ३१) च्या कलम ९ खाली स्थापन झालेली जीवन विमा निगम किंवा जनरल इन्शुअरन्स बिझिनेस (नॅशनलायझेशन) अधिनियम, १९७२(१९७२ चा ५७) खाली स्थापन झालेली जनरल इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया व तिच्या दुय्यम कंपन्या, किंवा भारतीय लघु उद्योग विकास अधिनियम, १९८९(१९८९ चा ३९) खाली स्थापन झालेली स्मॉल इंडस्ट्रीज डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया, किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया अधिनियम १९६३ (१९६३ चा ५२) खाली स्थापन झालेला युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया किंवा नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेवलपमेंट अधिनियम, १९८२ खाली स्थापन झालेली नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेवलपमेंट बँक किंवा इलेक्ट्रिसिटी (सप्लाय) अधिनियम, १९४८ खाली स्थापन झालेले वीज मंडळ किंवा तामिलनाडु इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लि. किंवा नॅशनल इंडस्ट्रियल डेवलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. किंवा रिहॅबिलिटेशन इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., किंवा इंडस्ट्रियल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. किंवा इंडस्ट्रियल फायनास कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. किंवा इंडस्ट्रीयल डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया, किंवा रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन लि. किंवा मिनरल्स अँड मेटल्स ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि., किंवा दि ॲग्रिकल्चरल फायनान्स कॉर्पोरेशन लि. किंवा स्टेट इंडस्ट्रियल अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि., किंवा गुजरात इंडस्ट्रियल अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लि. किंवा एशियन डेवलपमेंट बँक किंवा इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन किंवा रिझर्व बँकेने ह्याबाबत विहित केलेली कोणतीही संस्था, ह्यांचे कडून मिळालेली कोणतीही रक्कम.

[४] अधिसूचना क्र. १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये खोडून पुनर्स्थापित.
[५] अधिसूचना क्र. १३४ दि. जानेवारी १३, २०००पुनर्स्थापित
[६] अधिसूचना क्र. १८९ दि. डिसेंबर ६, २००६ पुनर्स्थापित.

क) एखाद्या कंपनीला अन्य कोणत्याही कंपनीकडून मिळालेली रक्कम.
ड) शेअर्स, स्टॉक्स, बॉंड्स किंवा डिबेंचर्स ह्यांचे वाटप होण्यापूर्वीच त्या शेअर्स, स्टॉक, बॉंड्स किंवा डिबेंचर्ससाठी मिळालेली कोणतीही रक्कम आणि त्या कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोशिएशन अनुसार, शेअर्सवरील कॉल-इन-ॲडव्हान्सच्या स्वरुपात मिळालेली रक्कम. मात्र कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोशिएशन अनुसार त्या रकमेचे सभासदांना पुनर्प्रदान केले जाऊ नये.
ई) एखादी व्यक्ती त्या कंपनीचा संचालक असताना तिच्याकडून मिळालेली कोणतीही रक्कम किंवा एखाद्या खाजगी कंपनीला, किंवा कंपनीज अधिनियम १९५६च्या कलम ४३ अ खाली पब्लिक कंपनी झालेली व कंपनीज अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम ३ च्या उपकलम (१) च्या खंड (३) मध्ये विहित केलेल्या बाबींसंबंधीच्या तरतुदी, तिच्या आर्टिकल्स ऑफ असोशिएशनमध्ये समाविष्ट करणे सुरुच ठेवणाऱ्या एखाद्या खाजगी कंपनीला तिच्या भागधारकांकडून मिळालेली कोणतीही रक्कम.
मात्र, ज्याच्याकडून ते पैसे मिळाले आहेत त्या संचालकाने किंवा भागधारकाने, ते पैसे देतेवेळी त्या कंपनीला एक घोषणापत्र द्यावे की, त्याने दिलेली रक्कम ही त्याला मिळालेल्या निधीमधून किंवा त्याने उधार घेऊन किंवा इतरांकडून मिळविलेली नाही.
[७][मात्र ह्याशिवाय, एखाद्या खाजगी कंपनीच्या संयुक्त भागधारकांबाबत, प्रथम-नामांकित शेअर होल्डर सोडल्यास, त्या संयुक्त-भागधारकांच्या नावाने मिळालेले पैसे, कंपनीच्या शेअर होल्डरकडून मिळाल्याचे समजले जाणार नाही]
फ) कंपनीच्या कोणत्याही अचल मालमत्तेला किंवा अन्य ॲसेट तारण ठेवून प्रतिभूतित केलेल्या बॉंड्स किंवा डिबेंचर्स देऊन किंवा त्यांचे कंपनीमधील शेअर्समध्ये परिवर्तन करण्याच्या ऑप्शनसह उभी केलेली रक्कम. मात्र अचल मालमत्ता किंवा अन्य ॲसेट्स तारण ठेवून प्रतिभूतित केलेल्या अशा बॉंड्स किंवा डिबेंचर्सच्या बाबतीत, अशा बॉंड्स किंवा डिबेंचर्सची रक्कम अशा मालमत्ता/ॲसेट्सच्या बाजारमूल्यापेक्षा अधिक असू नये.

ग) कर्जदायी संस्थांच्या अटींनुसार, प्रायोजकानी अप्रतिभूतित कर्जाच्या स्वरुपात आणलेली कोणतीही रक्कम. मात्र त्यासाठी पुढील अटींचे पालन केले असले पाहिजेः-

१) असे वित्त देण्याबाबतच्या प्रायोजकांच्या दायित्वानुसार, कर्जदायी सार्वजनिक संस्थांनी घातलेल्या अटींनुसार कर्ज आणले गेले असावे.

२) ते कर्ज त्या प्रायोजकांनी स्वतः/किंवा त्यांच्या नातेवाईकांनी उभे केलेले असावे. व त्यांचे व्यवसाय-सहकारी किंवा मित्रांकडून घेतलेले नसावे.

३) ह्या उपकलमाखालील सूट केवळ त्या वित्तीय संस्थेच्या कर्जाची परतफेडी केले जाईपर्यंतच उपलब्ध असेल परंतु त्यांनंतर नाही.

[८][(ह) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कंट्रोल बोर्ड ऑफ इंडिया (म्युच्युअल फंड्स) विनियम, १९९६ द्वारा नियंत्रित म्युच्युअल फंडाकडून मिळालेली कोणतीही रक्कम]
[९][(आय) साठ महिन्यां पेक्षा कमी परिपक्वता नसलेल्या, हायब्रिड डेट किंवा सबॉर्डिनेट डेट म्हणून मिळालेली कोणतीही रक्कम]
[१०][(ज) एखाद्या एनबीएफसीच्या संचालकाच्या नातेवाईकाकडून मिळालेली कोणतीही रक्कम

**टीपाः-** केवळ ठेवीदाराने केलेल्या अर्जाद्वारेच ठेव स्वीकारली जाईल. व त्या अर्जात निर्देशित केले असेल की, कंपनीज अधिनियम, १९५६(१९५६ चा १) खाली व्याख्या केल्यानुसार तो विशिष्ट संचालकाचा नातेवाईक आहे.]
[११][(के) परिपत्रक क्र. आयईसीडी. ३/०८.१५.०१/२०००-२००१ दि ऑक्टोंबर १०, २००० अनुसार ह्या बँकेने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, कमर्शियल पेपर देऊन मिळालेली कोणतीही रक्कम]
[१२][(ल) वेळोवेळी सुधारित केलेल्या कंपनी परिपत्रक डीएनबीएस (पीडी) सीसी, क्र.१३१/०३.०५.००२/२००८-०९ दि ऑक्टोंबर २९, २००८ अनुसार, सिस्टमॅटिकली इंपॉर्टंट व ठेवी न स्वीकारणाऱ्या अबँकीय वित्तीय कंपनीने स्वीकारलेली कोणतीही रक्कम]
“(म) आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ८० सीसीएफ खाली, केंद्र सरकारने वेळोवेळी दिलेल्या अधिसूचनेत विहित केल्यानुसार, एखाद्या इन्फ्रास्ट्रक्चर वित्तीय कंपनीने, इन्फ्रास्ट्रक्चर बॉंड्स देऊन उभी केलेली रक्कम.” [१३]

[७] अधिसूचना क्र. १३४ दि. जानेवारी १३, २००० अन्वये स्थापित
[८] अधिसूचना क्र. १३३ दि. नोव्हेंबर १५, १९९९ अन्वये स्थापित
[९] अधिसूचना क्र. १३४ दि. जानेवारी १३, २००० अन्वये स्थापित व त्यालाच अधिसूचना क्र. १४१ दि जून ३०, २००० चा क्रमांक (१) देण्यात आला आहे.
[१०] अधिसूचना क्र. १४१ दि. जून ३०, २००० अन्वये स्थापित
[११] अधिसूचना क्र. १४८ दि. जून २७, २००१ अन्वये समाविष्ट
[१२] अधिसूचना क्र. २०३ दि ऑक्टोंबर २९, २००८ अन्वये समाविष्ट
[१३] अधिसूचना क्र. डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.२०३/०३.१०.००१/२०१०-११ दि. ऑक्टोबर २२, २०१० अन्वये स्थापित.

(१३) "सिक्युरिटीज्" (प्रतिभूती) म्हणजे, सिक्युरिटीज कॉंट्रॅक्ट्स (रेग्युलेशन) अधिनियम, १९५६ (१९५६ चा ४२) च्या कलम २ (ह) मध्ये व्याख्या केलेल्या सिक्युरिटीज्.

(१४) "स्टॉक ब्रोकिंग कंपनी" म्हणजे, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया अधिनियम, १९९२ (१९९२ चा १५) च्या कलम १२ खाली पंजीकरणाचे वैध प्रमाणपत्र मिळालेली सब-ब्रोकरचा व्यवसाय करणारी कंपनी. आणि

(१५) "स्टॉक एक्सचेंज" म्हणजे, सिक्युरिटीज कॉंट्रॅक्ट्स (रेग्युलेशन) अधिनियम, १९५६ (१९५६ चा ४२) च्या कलम ४ खाली स्टॉक एक्सचेंज म्हणून ओळखली जाणारी कंपनी.

**(२)** ह्यामध्ये वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या व रिझर्व बॅंक ऑफ इंडिया अधिनियम १९३४ (१९३४ चा २) किंवा कंपनीज अधिनियम १९५६(१९५६ चा १) [१४][किंवा नॉन-बॅंकिंग फायनान्शियल कंपनी प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बॅंक) निदेश, १९९८ किंवा अवशिष्ट अबॅंकिईय कंपन्या (रिझर्व बॅंक) निदेश १९८७] ह्यामध्ये व्याख्या केलेल्या शब्दांचा व शब्दासमूहांचा अर्थ त्या अधिनियमांमध्ये दिल्यानुसारच असेल.

**(३)** (१) एखादी कंपनी ही एक वित्तीय कंपनी आहे अथवा नाही असा प्रश्न उभा राहिल्यास त्या प्रश्नाची उकल, रिझर्व बॅंकेद्वारे, केंद्र सरकारशी सल्लामसलत करुन केली जाईल आणि असा निर्णय अंतिम समजला जाईल व तो सर्व संबंधित पक्षांवर बंधनकारक असेल.

(२) वित्तीय संस्था असलेली एखादी कंपनी ही, कर्जदायी कंपनी आहे किंवा ॲसेट फायनान्स कंपनी आहे असा प्रश्न निर्माण झाल्यास, [१५]रिझर्व बॅंक, त्या कंपनीचा मुख्य उद्योग व अन्य घटक विचारात घेऊन त्याबाबत निर्णय घेईल व असा निर्णय अंतिम सर्व संबंधित पक्षांवर बंधनकारक असेल.

**सूचना :** खोडण्यात आली आहे [१६]

[१४] अधिसूचना क्र. १२७ दि डिसेंबर १८, १९९८ अन्वये स्थापित
[१५] अधिसूचना क्र. १८९ दि डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित
[१६] अधिसूचना क्र. १८९ दि डिसेंबर ०६, २००६ अन्वये खोडण्यात आले.

## भाग २ सार्वजनिक ठेवींचा स्वीकार

**म्युच्युअल बेनिफिट वित्तीय कंपन्या सार्वजनिक ठेवींचा स्वीकार करण्याबाबतचे निर्बंध**

३.(१) [खोडण्यात आले आहे][१७]

(२) [ह्या निदेशातील तरतुदी म्युच्युअल बेनिफिट कंपनीला किंवा म्युच्युअल बेनिफिट वित्तीय कंपनीला लागु होणार नाहीत मात्र, अशा बाबतीत, त्या म्युच्युअल बेनिफिट कंपनीचा अर्ज, भारत सरकारद्वारा, कंपनीज अधिनियम १९५६ (१९५६ चा १) खाली फेटाळला गेला नसावा][१८]

**अबँकीय वित्तीय कंपन्यांद्वारे सार्वजनिक ठेवींचा स्वीकार केला जाण्यावरील निर्बंध**

**४. किमान क्रेडिट रेटिंग**

**(१)** जानेवारी ३१, १९९८ रोजी व पासून, -

१) पंचवीस लक्ष रुपये किंवा त्यापेक्षा अधिक निजनिधी (ह्यापुढे ह्याला 'एनओएफ' म्हणण्यात आले आहे)असलेली कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी, मंजुरीप्राप्त क्रेडिट रेटिंग एजन्सी पैकी एकीने, वर्षातून किमान एकदा, तिला स्थिर ठेवींसाठी किमान इन्व्हेस्टमेंट ग्रेड किंवा अन्य विहित क्रेडिट रेटिंग दिले असल्याखेरीज, तसेच त्या रेटिंगची एक प्रत रिझर्व बँकेकडे, प्रुडेंशियल नॉर्म्स वरील रिटर्न्ससह पाठविल्याखेरीज, सार्वजनिक स्वीकारणार नाही.

[१९][मात्र, हा खंड, खाली दिलेल्या उपपरिच्छेद (४) च्या खंड (अ) मध्ये संदर्भित अशा ॲसेट फायनान्स कंपनीला[२०] लागु होणार नाही]

२) कोणत्याही अबँकीय वित्तीय कंपनी स्तर तिच्या पूर्वी असलेल्या क्रेडिट स्तरापेक्षावर अथवा खाली करतेवेळी, तिचे असे क्रेडिट रेटिंग केल्याच्या पंधरा कामकाजांच्या दिवसांच्या आत, स्तर वर/खाली केला जाण्याबाबत रिझर्व बँकेला कळविण्यात यावे.

**मंजुरीप्राप्त क्रेडिट रेटिंग एजन्सी आणि किमान इन्व्हेस्टमेंट ग्रेड क्रेडिट रेटिंग**

मंजुरीप्राप्त क्रेडिट रेटिंग एजन्सीज् व किमान क्रेडिट रेटिंग पुढीलप्रमाणे असेल —

| एजन्सीचे नाव | किमान इन्व्हेस्टमेंट ग्रेड रेटिंग |
|---|---|
| (अ) दि क्रेडिट रेटिंग इन्फर्मेशन सर्व्हिसेस ऑफ इंडिया लि. (क्रिसील) | एफए - (एफ ए मायनस) |
| (ब) आयसीआरए लि. | एमए - (एम ए मायनस) |
| (क) क्रेडिट ॲनालिसिस ॲंड रिसर्च लि. (केअर) | केअर बीबीबी (एफडी) |
| (ड) [२१][ फिच रेटिंग इंडिया प्रा.लि.] | [२२][टीए-(इंड) (एफडी)] |
| [२३] (ई) ब्रिकवर्क रेटिंग इंडिया प्रा.लि. (ब्रिकवर्क) | बी डब्ल्युआर एफ ए |

[१७] अधिसूचना क्र. १९७ दि नोव्हेंबर २२, २००७ अन्वये खोडण्यात आले.
[१८] अधिसूचना क्र. १९७ दि नोव्हेंबर २२, २००७ अन्वये स्थापित.
[१९] अधिसूचना क्र. १३४ दि जानेवारी १३,२००० अन्वये स्थापित.
[२०] अधिसूचना क्र. १८९ दि. डिसेंबर ०६, २००६ अन्वये प्रतिस्थापित
[२१] अधिसूचना क्र. १४८ दि. जुन २७, २००१ अन्वये प्रतिस्थापित
[२२] अधिसूचना क्र. १५९ दि. ऑक्टोबर १, २००२ अन्वये प्रतिस्थापित

**डिमांड डिपॉझिट स्वीकारण्यांबाबत मनाई**

(२) जानेवारी ३१, १९९८ रोजी व पासून कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी, जानेवारी ३१, १९९८ पूर्वी किंवा नंतर स्वीकारलेले असले तरीही व मागणी केल्यावर परतफेड करावयाची असणारी कोणातीही सार्वजनिक ठेव स्वीकारणार नाही किंवा तिचे नूतनीकरण करणार नाही.

**सार्वजनिक ठेवींचा कालावधी**

(३) जानेवारी ३१, १९९८ रोजी आणि पासून, कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी, जानेवारी ३१ १९९८ पूर्वी किंवा नंतर स्वीकारलेले असले तरीही, बारा महिन्यांच्या काळानंतर, परंतु स्वीकारण्याच्या किंवा नूतनीकरणाच्या तारखेपासून साठ महिन्यांपेक्षा अधिक नसलेल्या काळासाठी, त्या ठेवीचे पुनर्प्रदान करावयाचे असल्याखेरीज कोणताही सार्वजनिक ठेव स्वीकारणार नाही किंवा तिचे नूतनीकरण करणार नाही.

**(४) ठेवीच्या परिणामावरील (क्वांटम) मर्यादा**

**ॲसेट फायनान्स कंपनी (एएफसी)[२४] लोन कंपनी (एलसी) आणि इन्व्हेस्टमेंट कंपनी (आयसी) –**

**सार्वजनिक ठेवींचा स्वीकार करणे**

खाली दिलेल्या प्रकाराव्यतिरिक्त, कोणतीही फायनान्स कंपनी[२५] किंवा इन्व्हेस्टमेंट कंपनी सार्वजनिक ठेवी स्वीकारणार नाही किंवा नूतनीकरण करणार नाही - *

[२३] अधिसूचना डीएनबीएस.(पीडी) २४३/सीजीएम (युएस) -२०१२ दि. मे ११, २०१२ अन्वये स्थापित.
[२४] अधिसूचना १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित.
[२५] अधिसूचना १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित.

*एका सावकाश, अखंड व भेदभाव नसलेल्या रितीने, ठेवी स्वीकारणा-या एनबीएफसींचा एनओएफ किमान रु. २०० लाखापर्यंत नेण्यासाठी एक मोजून-मापून केलेली हालचाल/कृती, (अधिसूचना क्र. १९९ - सीजीएम (पीके) २००८ अन्वये) करण्याबाबत पुढीलप्रमाणे विहित करण्यात आले होते.

(अ) पहिली पायरी म्हणून, रु. २०० लाखांपेक्षा कमी असा किमान एनओएफ असलेल्या एनबीएफसी, त्यांच्याकडे असलेल्या ठेवींची सध्याची पातळी गोठवू शकतात.
(ब) ह्याशिवाय ३१ मार्च, २००९ पर्यंत किमान गुंतवणुक दर्जाचे क्रेडिट रेटिंग आणि १२% सीआरएआर असलेल्या, ॲसेट फायनान्स कंपन्या (एएफसी) त्यांच्या सार्वजनिक ठेवी, त्यांच्या एनओएफच्या १.५ पट एवढ्या कमी करु शकतात तर इतर सर्व कंपन्या त्यांच्या सार्वजनिक ठेवींचा स्तर त्यांच्या एनओएफएवढा ठेवू शकतात.
(क) एका विशिष्ट स्तरापर्यंत सार्वजनिक ठेवी स्वीकारण्यास सध्या पात्र असलेल्या कंपन्यांनी, कोणत्याही कारणाने, त्या स्तरापर्यंत ठेवी स्वीकारल्या नसल्यास, त्यांना, वर विहित केलेल्या सुधारित स्तरापर्यंत सार्वजनिक ठेवी स्वीकारण्याची परवानगी आहे.
(ड) रु. २०० लाखपर्यंत एनओएफ ठेवल्यानंतर, त्या कंपन्या त्यांच्या तशा एनओएफ ठेवला असण्याबाबतचे वैधानिक ऑडिटर्सकडील प्रमाणपत्र सादर करु शकतात.
(ई) विहित केलेल्या कालावधीत, विहित केलेली मर्यादा साध्य न करणा-या एनबीएफसी, ह्याबाबत योग्य तो संकेत मिळविण्यासाठी रिझर्व बँकेकडे अर्ज करु शकतात. असे अर्ज प्रकरणानुसार विचारात घेतले जातील.

**एएफसी** [२६]

अ) अशी ॲसेट कंपनी की जी[२७]-
१) रुपये पंचवीस लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक एनओएफ असलेली
२) तिच्या शेवटच्या ताळेबंदानुसार पंधरा टक्क्यांपेक्षा कमी कॅपिटल ॲडेक्वसी रेशो नसलेली व सर्व प्रुडेंशियल नॉर्म्सचे पालन केले असणारी आहे,
अशी ॲसेट कंपनी, तिच्या एनओएफच्या दीडपटीपेक्षा अधिक नसलेल्या रकमेचे, त्या कंपनीच्या लेखा पुस्तकात, ठेव किंवा नूतनीकरणाच्या तारखेस आउटस्टँडिंग रकमां, किंवा रुपये दहाकोटी पर्यंतची सार्वजनिक ठेव ह्यापेक्षा जी कमी असेल त्या रकमेपर्यंतची ठेव स्वीकारु शकते किंवा नूतनीकरण करु शकते.
ब) अशी एखादी ॲसेट कंपनी [२८]
१) पंचवीस लक्ष रुपये किंवा अधिक एनओएफ असलेली
२) सर्व प्रुडेंशियल नॉर्म्सची पूर्तता करणारी आणि
३) किमान इन्व्हेस्टमेंट ग्रेड क्रेडिट रेटिंग असलेली आहे. अशी कंपनी
ठेवी स्वीकारण्याच्या किंवा नूतनीकरणाच्या तारखेस तिच्या लेखा पुस्तकात आउटस्टँडिंग असलेल्या रकमांसह तिच्या एनओएफच्या चारपट सार्वजनिक ठेवी स्वीकारु शकते किंवा नूतनीकरण करु शकते.

**एलसी/आयसी**
क) अशी एखादी लोन कंपनी किंवा इन्व्हेस्टमेंट कंपनी जी,
१) पंचवीस लाख किवा त्यापेक्षा अधिक एनओएफ असलेली
२) किमान इन्व्हेस्टमेंट ग्रेड क्रेडिट असलेली आणि,
३) सर्व प्रुडेंशियल नॉर्म्स पूर्ण करणारी व शेवटच्या ऑडिटेड ताळेबंदानुसार पंधरा टक्क्यांपेक्षा कॅपिटल ॲडेक्वसी रेशो असणारी अशी आहे. ती कंपनी ठेवी स्वीकारण्याच्या किंवा नूतनीकरणाच्या तारखेस तिच्या लेखा पुस्तकात आउटस्टँडिंग असलेल्या रकमांसह तिच्या एनओएफच्या दीडपट सार्वजनिक ठेवी स्वीकारु शकते किंवा नूतनीकरण करु शकते.

मात्र, वरील सर्व अटींची पूर्तता करणारी एएए (ट्रिपल ए) क्रेडिट रेटिंग असणारी परंतु पंधरा टक्क्यांचा कॅपिटल ॲसेक्वसी रेशो नसलेली लोन किंवा इन्व्हेस्टमेंट कंपनी, तिचे क्रेडिट रेटिंग तेच असेपर्यंत, डिसेंबर १८, १९९८ रोजी व्यवहार बंद होतेवेळी तिच्या आउटस्टँडिंग असलेल्या रकमे एवढी किंवा तिच्या एनओएफच्या दीडपट ह्यापैकी जे अधिक असेल त्या रकमे एवढी सार्वजनिक ठेव स्वीकारु शकते किंवा नूतनीकरण करु शकते. आणि ह्या निदेशांच्या परिच्छेद ४(६) मध्ये दिलेल्या स्तरापर्यंत सार्वजनिक ठेवी तिने कमी कराव्यात आणि मार्च ३१, २००० पर्यंत तिने आपला कॅपिटल ॲडेक्वसी रेशो पंधरा टक्क्यांपर्यंत असावा.

ड) हे निदेश जारी होण्याच्या तारखेस सर्व प्रुडेंशियल नॉर्म्सची पूर्तता करणारी लोन कंपनी किंवा इन्व्हेस्टमेंट कंपनी जी -

१) रुपये पंचवीस लक्ष किंवा अधिक एनओएफ असणारी; आणि
२) एए(डबल ए) ग्रेडचे क्रेडिट रेटिंग असलेली, परंतु शेवटच्या ऑडिटेड ताळेबंदानुसार, पंधरा टक्के किंवा त्यापेक्षा अधिक कॅपिटल ॲडेक्वसी रेशो असलेली कंपनी -

तिच्या क्रेडिट रेटिंगची तीच स्थिती टिकवून असेपर्यंत, त्या ठेवीं स्वीकारण्याच्या किंवा त्यांचे नूतनीकरणाच्या तारखेस त्या कंपनीच्या लेखा पुस्तकात आउटस्टँडिंग दाखविलेल्या रकमांसह, तिच्या एनओएफच्या सममूल्य रकमेपेक्षा अधिक नसलेल्या, पंधरा टक्कयांचा कॅपिट्ल ॲडेक्व्सी रेशो मिळवेपर्यंत, परंतु मार्च ३१, २०००(ऑडिटेड बॅलन्स शीट प्रमाणे) च्या आत, इतर सर्व अटी कायम ठेवून, सार्वजनिक ठेवींचा स्वीकार किंवा नूतनीकरण करु शकते.

[२६] अधिसूचना १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित.
[२७] अधिसूचना १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित.
[२८] अधिसूचना १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित.

ई) सर्व प्रुडेंशियल नॉर्म्सची पूर्तता करणारी व हे निदेश जारी होण्याच्या तारखेस पुढील अटी पूर्ण करणरी लोन कंपनी किंवा गुंतवणुक कंपनी -

१) रुपये पंचवीस लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक एनओएफ
२) ए (सिंगल ए) ग्रेडचे क्रेडिट रेटिंग असलेली व शेवटच्या ऑडिटेड ताळेबंदानुसार, पंधरा टक्के किंवा अधिक कॅपिटल ॲडेक्वसी रेशो नसलेली अशी कंपनी -

तिच्या क्रेडिट रेटिंगची तीच स्थिती टिकवून असेपर्यंत, त्या ठेवीं स्वीकारण्याच्या किंवा त्यांचे नूतनीकरणाच्या तारखेस त्या कंपनीच्या लेखा पुस्तकात आउटस्टँडिंग दाखविलेल्या रकमांसह, पंधरा टक्कयांचा कॅपिट्ल ॲडेक्व्सी रेशो मिळवेपर्यंत, परंतु मार्च ३१, २०००(ऑडिटेड बॅलन्स शीट प्रमाणे) च्या आत, इतर सर्व अटी कायम ठेवून, सार्वजनिक ठेवींचा स्वीकार किंवा नूतनीकरण करु शकते.

**क्रेडिट रेटिंग खाली येणे**

५) वरील परिच्छेद ४(४) मध्ये दिलेल्या किमान विहित गुंतवणुक दर्जापेक्षा क्रेडिट रेटिंग कमी झाल्यास, अबँकीय वित्तीय कंपनी अतिरिक्त ठेवी पुढीलप्रमाणे नियमित करील -

**एएफसी** [२९]

१) एखादी ॲसेट फायनान्स कंपनी [३०]

अ) वरील परिच्छेद ४(४) च्या उपखंड (ब) खाली परवानगी असलेल्या मर्यादेपयंत आधीच सार्वजनिक ठेवी तिने धारण केल्या असल्यास सार्वजनिक ठेवी स्वीकारणे ताबडतोब बंद करील.
ब) कामकाजाच्या पंधरा दिवसांच्या आत रिझर्व बँकेला त्याबाबतची स्थिती कळवील. आणि
क) क्रेडिट रेटिंग कमी केल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत, अतिरिक्त असलेली सार्वजनिक ठेव, त्या ठेवी परिपक्व झाल्यावर परत करुन शून्यावर आणले किंवा परिच्छेद ४(४) च्या उपखंड (अ) खाली परवानगी असलेल्या सुयोग्य मर्यादेत आणेल.

**एलसी/आयसी**

२) एखादी कर्ज कंपनी किंवा गुंतवणुक कंपनी -

अ) सार्वजनिक ठेवी स्वीकारणे ताबाडतोब बंद करील.
ब) कामकाजाच्या पंधरा दिवसांच्या आत त्याबाबतची स्थिती रिझर्व बँकेला कळवील आणि
क) असे क्रेडिट रेटिंग कमी केल्याच्या तारखेच्या तीन वर्षांच्या आत, त्या ठेवी परिपक्व झाल्यावर त्यांची परतफेड करुन, अतिरिक्त सार्वजनिक ठेवींची रक्कम शून्यावर आणील.

**आधी स्वीकारलेल्या व परवानगीप्राप्त मर्यादेच्या अतिरिक्त**
**<u>असलेल्या सार्वजनिक ठेवी नियमित करणे.</u>**

६) जेव्हा एखाद्या ॲसेट फायनान्स कंपनी [३१] किंवा कर्ज कंपनी किंवा गुंतवणुक कंपनीने, डिसेंबर १८, १९९८ रोजी व्यवहार संपतेवेळी, ह्या निदेशांच्या तरतुदीखाली स्वीकारण्यास पात्र असलेल्या मर्यादेपेक्षा अधिक सार्वजनिक ठेवी धारण केल्या असतील तर तिने –

[२९] अधिसूचना क्र १८९ दि डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित
[३०] अधिसूचना क्र १८९ दि डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित
[३१] अधिसूचना क्र १८९ दि डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित

१) सार्वजनिक ठेवी स्वीकारणे थांबवावे आणि

२) डिसेंबर ३१, २००१ पूर्वी, अशी ठेव परिपक्व झाल्यावर तिची परतफेड करुन अतिरिक्त ठेवीची रक्कम शून्यावर किंवा परिच्छेद ४(४) च्या उपखंड (ड) किंवा (ई) खाली परवानगी प्राप्त व सुयोग्य स्तरावर आणावी.

**टीपा :**
विनियामक मर्यादा किंवा क्रेडिट रेटिंग कमी केल्यामुळे सार्वजनिक ठेवी अतिरिक्त झाल्यास, ती एनबीएफसी, परिच्छेद ४ च्या उपखंड (५) व (६) मधील पुनर्प्रदान अटींचे व ह्या निदेशातील तरतुदींचे पालम केले असल्यास परिपक्व होणाऱ्या सार्वजनिक ठेवीचे नूतनीकरण करु शकते. येथे स्पष्ट केले जात आहे की ठेवीदाराच्या संमतीशिवाय परिपक्व झालेल्या कोणत्याही सार्वजनिक ठेवीचे नूतनीकरण केले जाणार नाही.

**<u>व्याजदरावरील मर्यादा</u>**

[३२] [(७) एप्रिल २४, २००७ रोजी व पासून कोणतीही अबँकीय वित्तकंपनी, दरसाल साडेबारा टक्के ह्या दरापेक्षा अधिक व्याजदराने कोणहीही सार्वजनिक ठेव आवाहित स्वीकार किंवा तिचे नूतनीकरण करणार नाही. त्यावरील व्याज मंथली रेस्टपेक्षा कमी नसलेल्या रेस्टवर दिले किंवा चक्रवाढ केले जावे.]

[33][(**७अ**) सप्टेंबर १८, २००३ रोजी व पासून कोणतीही अबँकीय वित्त कंपनी, <u>अधिसूचना क्र. फेमा. ५/२०००-आरबी दि. मे ३, २०००</u> अनुसार, अनिवासी (बाह्य) खाते योजनेखाली, रिझर्व बँकेने अनुसूचित वाणिज्य बँकांमधील अशा ठेवींसाठी विहित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने, प्रत्यावर्तनीय ठेवींचे आवाहन, स्वीकार किंवा नूतनूकरण करणार नाही

**स्पष्टीकरण**

वरील ठेवींसाठीचा कालावधी एक वर्षापेक्षा कमी व तीन वर्षापेक्षा अधिक नसेल]

**<u>दलालीचे प्रदान</u>**

८) जानेवारी ३१, १९९८ रोजी व पासून, कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी, कोणत्याही दलालाला, किंवा त्याच्या मार्फत गोळा केलेल्या सार्वजनिक ठेवींवर -

१) गोळा केलेल्या ठेवींच्या दोन टक्क्यांपेक्षा अधिक ब्रोकरेज, दलाली, इन्सेंटिव किंवा कोणत्याही नावाने असलेल्या अन्य लाभ देणार नाही.

२) अशा प्रकारे गोळा केलेल्या ठेवींच्या ०.५ टक्क्यांपेक्षा अधिक असो, त्याने सादर केलेल्या पावत्या/बिले ह्याच्या आधारावर, खर्चाचा परतावा देणार नाही.

[३४]**[<u>ठेवीदारांना ठेवींच्या परिपक्वतेबाबतची सूचना</u>**
(**८अ**) ठेवीदारांना त्यांच्या ठेवींच्या परिपक्वतेबाबतची सूचना, त्या ठेवींच्या परिपक्वता-तारखेच्या दोन महिने आधी देण्याची जबाबदारी, त्या अबँकीय वित्त कंपनीचीच असेल]

**<u>सार्वजनिक ठेवीचे नूतनीकरण</u>**
(**९**) अधिकतर व्याजदराचा लाभ घेण्यासाठी, जेव्हा एखादी अबँकीय वित्त कंपनी तिच्या विद्यमान ठेवीदाराला, ती ठेव परिपक्व होण्यापूर्वीच तिचे नूतनीकरण करण्याची परवानगी देत असेल, तेव्हा अशी कंपनी पुढील अटींवर, त्या ठेवीदाताला व्याजदतातील वाढ देऊ करील —

[३२] अधिसूचना क्र. १९५ दि एप्रिल २४, २००७ अन्वये प्रतिस्थापित
[३३] अधिसूचना क्र. १७४ सप्टेंबर १७,२००३ अन्वये स्थापित
[३४] अधिसूचना क्र. १७९ दि.ऑक्टोंबर ५, २००४ अन्वये स्थापित

१) ह्या निदेशांमधील अन्य तरतुदीनुसारच आणि मूळ करारातील शेष कालावधीपेक्षा अधिक कालासाठी ठेवीचे नूतनीकरण करण्यात आले आहे; आणि

२) अशी ठेव, ती ठेव असण्याच्या कालासाठी स्वीकारली गेली असली तर कंपनीने सर्वसाधारणतः जो व्याजदर दिला असता, त्या दराच्या एक टक्का कमी पॉईंटने, त्या ठेवीच्या गत-काळावर (एक्सपायर्ड पिरियड) व्याजदर कमी करण्यात आला आहे, अशा कमी केलेल्या दरापेक्षा अधिक दराने आधी दिलेले व्याज वसूल/ॲडजस्ट करण्यात आले आहे.

**मुदतबाह्य (ओव्हरड्यु) सार्वजनिक ठेवींवरील व्याजाचे प्रदान**

**(१०)** एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीला तसे वाटाल्यास ती, ओव्हरड्यु सार्वजनिक ठेवीवर किंवा अशा ठेवीच्या एखाद्या भागावर, ती ठेव परिपक्व झाल्याच्या तारखेपासून, व्याज देऊ शकते, मात्र त्यासाठी पुढील अटी आहेत -

१) मुदतीबाहेरच्या ठेवींची एकूण रक्कम किं तिचा भाग, ह्या निदेशातील संबंधित अशा अन्य तरतुदीनुसार, त्या ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेपासून भविष्यातील एखाद्या तारखेपर्यंत नूतनीकृत केला जावा.

२) देण्यात येणारे व्याज हे, अशा मुदतीबाहेरील ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेस लागु होणाऱ्या सुयोग्य दराने असावे व त्या ठेवीचे नूतनीकरण केलेल्या रकमेवरच दिले जावे.

मात्र, जेथे ठेवीदाराचे मागणी केल्यावर एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीद्वारे, ठेव परिपक्व झाल्यावरही तिचे व्याजासकट प्रदान न केले गेल्यास, त्या अबँकीय वित्तीय कंपनीला, मागणी केल्याच्या तारखेपासून, ती ठेव परत केल्याच्या तारखेपर्यंतचे त्या ठेवीला लागु असलेल्या व्याजदरानुसार व्याज द्यावे लागेल.

**संयुक्त ठेव**

**(११)** तशी इच्छा व्यक्त केली गेल्यास कोणत्याही कलमासह किंवा कलमाशिवाय (म्हणजे " उत्तरजीवीत किंवा दोन्हीपैकी एक", "प्रथम क्रमांकाचा किंवा उत्तरजीवी", "कोणीही एक किंवा उत्तरजीवी") ठेवी स्वीकारल्या जाऊ शकतात.

**सार्वजनिक ठेवी मागविण्याच्या अर्जाच्या फॉर्ममध्ये द्यावयाचा तपशील**

**(१२)** (१)जानेवारी ३१, १९९८ रोजी व पासून, कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी, त्या कंपनी, त्या कंपनीने पुरविलेल्या फॉर्ममध्ये ठेवीदाराने लेखी स्वरुपात अर्ज दिल्याशिवाय कोणतीही सार्वजनिक ठेव स्वीकारणार नाही किंवा नूतनीकरण करणार नाही. ह्या फॉर्ममध्ये, कंपनीज अधिनियम १९५६(१९५६ चा १) च्या कलम ५८अ खाली तयार केलेला व अबँकीय वित्तीय कंपन्या आणि संकीर्ण अबँकीय कंपन्या (जाहिराती) नियम १९७७ मध्ये निर्देशित तपशील असेल आणि त्याच बरोबर त्या ठेवीदाराचा विशिष्ट वर्ग ही दिला असेल. उदा - तो ठेवीदार, त्या कंपनीचा शेअरहोल्डर किंवा संचालक किंवा प्रायोजक आहे की जनतेपैकी एक आहे.

२) त्या अर्जाच्या फॉर्म मध्ये पुढील गोष्टी असाव्यातः-

अ) तिच्या स्थिर ठेवींसाठी दिले गेलेले क्रेडिट रेटिंग व त्या कंपनीला क्रेडिट रेटिंग देणाऱ्या क्रेडिट रेटिंग एजन्सीचे नाव किंवा ती कंपनी एक ॲसेट फायनान्स कंपनी [३५] असल्यास तिच्या व्यवस्थापनाने पुढीलप्रमाने दिलेले निवेदन की, सार्वजनिक ठेवींची तिने धारण केलेली रक्कम/हिस्सा हा तिच्या एनओएफच्या दीडपटीपेक्षा किंवा रुपये दहा कोटी (जे कमी असेल ते) पेक्षा अधिक नाही.

ब) अशा ठेवींच्या अटी व शर्तीनुसार ती ठेव किंवा तिचा भाग ह्यांच्या पुनर्प्रदान न करण्याच्या बाबतीत, ठेवीदार कंपनी लॉ बोर्डबेंचच्या पूर्व/पश्चिम/उत्तर/दक्षिण विभागाशी (लागु नसलेले खोडा) संपर्क साधू शकतात. त्यांचा संपूर्ण पत्ता खाली दिला आहे.
जेथे, त्या कंपनीचे पजीकृत कार्यालय ज्याच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या कंपनी लॉ बोर्डच्या बेंचचा पत्ता द्यावा.

[३५] अधिसूचना क्र. १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित

क) त्या कंपनीकडून त्या ठेवीबाबत कार्यवाही करण्यात त्रुटी येत असल्यास, ठेवीदार, राष्ट्रीय उपभोक्ता तक्रार निवारण मंच, राज्य स्तरीय उपभोक्ता तक्रार निवारण मंच, किंवा जिल्हास्तरीय उपभोक्ता तक्रार निवारण मंच ह्यांचेकडे जाऊ शकतात.

ड) कंपनीने प्रदर्शित केलेली तिची आर्थिक परिस्थिती आणि अर्जाच्या फॉर्ममध्ये दिलेली माहिती ही सत्य व खरी असून, ती कंपनी व तिचे संचालक मंडळ त्या सत्यतेबाबत जबाबदार आहेत असे निवेदन.

ई) कंपनीच्या वित्तीय कार्यकृती रिझर्व बँकेद्वारा नियंत्रित केल्या जातात तथापि येथे स्पष्टपणे समजण्यात यावे की, एखाद्या कंपनीच्या वित्तीय सुदृढतेबाबत किंवा तिने दिलेली निवेदने किंवा माहिती/दावे किंवा तिची मते तसेच ठेवींची परतफेड/दायित्व पूर्ण करणे ह्याबाबत रिझर्व बँक कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

फ) अर्जाच्या फॉर्मच्या शेवटी परंतु ठेवीदाराच्या सही आधी, ठेवीदाराकडून सत्यांकनाचा पुढील खंड दिला जावाः

"ह्या कंपनीने दिलेली वित्तीय व अन्य निवेदने/तपशील/माहिती मी वाचली आहे. आणि काळजीपूर्वक विचार करुन मी ह्या कंपनीमध्ये माझ्या स्वतःच्या जबाबदारीवर ही ठेव ठेवत आहे"

[३६] [(ग) ह्या सुविधेपासून निधी आधारित असलेले व आधारित नसलेले, देण्यात आलेले ड्युज्, आणि त्याच गटामधील कंपन्या व इतर संस्था किंवा उद्योग की ज्यामध्ये त्या वित्तीय कंपनीचे संचालक आणि/किंवा अबँकीय वित्तीय कंपन्या ह्यांचे लक्षणीय हितसंबंधी आहेत अशा कंपन्यांकडील एकूण येणे आणि अशा संस्थांबाबतच्या जोखमीची रक्कम ह्यासंबंधीची माहिती.]

[३७][(३) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, नवीन ठेवीदारांची खाती उघडण्यापूर्वी आणि ठेवी स्वीकारण्यापूर्वी त्या नवीन ठेवीदारांची सुयोग्य ओळख करुन घेईल आणि अशा ओळाखीसाठी आधारभूत असलेला पुरावा रेकॉर्डमध्ये ठेवील]

<u>**जाहिरात आणि जाहितातीऐवजी द्यावयाचे निवेदन :**</u>

**(१३)** (१)सार्वजनिक ठेवी मिळवू इच्छिणारी प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, अबँकीय वित्तीय कंपन्या व संकीर्ण अबँकीय कंपन्या (जहिरात) नियम, १९७७ च्या तरतुदींचे पालन करील व त्याखाली दिलेल्या जाहिरातीमध्ये पुढील बाबी स्पष्टपणे निर्देशित करीलः-

अ) व्याज, प्रिमियम, बोनस ह्यांच्या परताव्याचा प्रत्यक्ष दर आणि ठेवीदारासाठी असलेले लाभ;
ब) ठेव परत करण्याची रीत;
क) ठेवीचा परिपक्वता काल;
ड) ठेवीवर दिले जाणारे ज्याज;
ई) ठेवीदाराने ती ठेव मुदतीपूर्वी काढून घेतल्यास त्याला देय असलेला व्याजदर;
फ) ठेवीचे नूतनीकरण करण्यासाठी असलेल्या अटी व शर्ती;
ग) ती ठेव स्वीकारण्या/नूतनीकरण करण्यासाठी असलेल्या काही खास अटी व शर्ती

[३८][(ह) ह्या सुविधेपासून निधी आधारित असलेले व आधारित नसलेले, देण्यात आलेले ड्युज्, आणि त्याच गटामधील कंपन्या व इतर संस्था किंवा उद्योग की ज्यामध्ये त्या वित्तीय कंपनीचे संचालक आणि/किंवा अबँकीय वित्तीय कंपन्या ह्यांचे लक्षणीय हितसंबंधी आहेत अशा कंपन्यांकडील एकूण येणे आणि अशा संस्थांबाबतच्या जोखमीची रक्कम ह्यासंबंधीची माहिती आणि;]

[३६] अधिसूचना क्र. १३४ दि. जानेवारी १३, २००० अन्वये स्थापित.
[३७] अधिसूचना क्र. १३४ दि. जानेवारी १३, २००० अन्वये स्थापित.
[३८] अधिसूचना क्र. १२७ दि. डिसेंबर १८, १९९८ अन्वये स्थापित

[39] [(१) त्या कंपनीने आवाहित केलेल्या विमा-सुरक्षित नाहीत]

[40] [१३(१)(अ) जेव्हा एखादी एनबीएफसी, ठेवी आवाहित न करताही इलेक्ट्रोनिक माध्यमामध्ये कोणतीही जाहिरात प्रदर्शित करेल तेव्हा तिने अशा जाहिरातींमध्ये पुढील गोष्टी निर्देशित करणारे शीर्षक/पट्टी प्रदर्शित करावी :
कंपनी ठेवी स्वीकार कृतीबाबत, दर्शकांनी वृत्तपत्रातील जाहिरात/ठेवी आवाहित करण्याच्या अर्जाच्या फॉर्मवरील माहिती पहावी
ह्या कंपनीकडे, रिझर्व बँकेने, भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या कलम ४५-आयए खाली दिलेले दि.__________ चे वैध असे प्रमाणपत्र आहे. तथापि, भारतीय रिझर्व बँक, ह्या कंपनीची सुदृढता किंवा ह्या कंपनीने दिलेली निवेदने किंवा मते किंवा दावे ह्यांच्या खरेपणाबाबत अथवा ह्या कंपनीची दायित्वे/ठेवींची परतफेड ह्याबाबत जबाबदार असणार नाही.]

(२) जेथे एखादी अबँकीय वित्तीय कंपनी, आवाहन केल्याशिवाय किंवा अन्य व्यक्तीद्वारे आवाहन केल्याशिवाय किंवा त्यास तसे प्रवृत केल्याशिवाय सार्वजनिक ठेवी स्वीकारु इच्छिते तेव्हा, अशा ठेवी स्वीकारण्यापूर्वी तिने, जाहिरात देण्याऐवजी त्या जाहिरातीत देण्याचा तपशील असलेले निवेदन, अबँकीय वित्तीय कंपन्या आणि संकीर्ण अबँकीय वित्तीय कंपन्या (जाहिरात) नियम १९७७ अन्वये, रिझर्व बँकेकडे रेकॉर्डसाठी पाठविले पाहिजे तसेच वरील खंड (१) मध्ये दिलेला तपशीलही वरील नियमांनुसार सही करुन पाठविला पाहिजे.

(३) वरील खंड (२) खाली दिलेले निवेदन, ते दिले असल्याच्या आर्थिक वर्षाच्या अखेरच्या तारखेपासून सहा महिने संपेपर्यंत किंवा कंपनीच्या सर्वसाधारण सभेमध्ये ताळेबंद ठेवला जाण्याच्या तारखेपर्यंत किंवा जेथे कोणत्याही वर्षासाठी वार्षिक सर्वसाधारण सभा घेतली गेली नसेल तेथे, कंपनीज अधिनियम १९५६(१९५६ चा १) च्या तरतुदीनुसार ती सभा ज्या तारखेस घ्यावयास हवी होती त्या तारखेपर्यंत (यापैकी आधी असेल ते) वैध असेल आणि ह्या निवेदनाची वैधता समाप्त झाल्यावर नंतरच्या प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये, त्या आर्थिक वर्षात सार्वजनिक ठेवी घेण्यापूर्वी, नवीन निवेदन सादर करण्यात यावे.

**सार्वजनिक ठेवी परत करण्याबाबत सर्वसाधारण तरतुदी**

[41][ऑक्टोंबर ५, २००४ रोजी आणि पासून

**किमान लॉक-इन कालावधी आणि**
**<u>ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास करावयाची परतफेड</u>**

**(१४)** (१) ठेवीचा स्वीकार केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत (लॉकइन पिरियड)कोणतीही अबँकीय वित्तीय कंपनी सार्वजनिक ठेवीविरुद्ध कोणतेही कर्ज देणार नाही किंवा मुदत पूर्व पुनर्प्रदान करणार नाही.

मात्र, ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास, संयुक्त ठेव असल्यास, उत्तरजीवी ठेवीदारांना उत्तरजीवी खंड असल्यास किंवा नामनिर्देशितांना किंवा मृत ठेवीदाराच्या कायदेशीर वारसांना, ठेवीदाराच्या मृत्युबाबत कंपनीचे समाधान होईल असा पुरावा सादर केला गेल्यास, ती अबँकीय वित्तीय मुदतपूर्व व लॉक इन कालामध्येही ठेवीचे पुनर्प्रदान करु शकते.

**वादग्रस्त अबँकीय वित्तीय कंपनी नसलेल्या**
**<u>अबँकीय कंपनीद्वारा सार्वजनिक ठेवींचे पुनर्प्रदान</u>**

(२) उपपरिच्छेद (१) मधील तरतुदींनुसार, वादग्रस्त नसलेली अबँकीय वित्तीय कंपनी

(अ) ऑक्टोंबर ५, २००४ पासून तिच्या स्वतःच्या मतानुसार मुदतपूर्व पुनर्प्रदान करु शकते.

[39] अधिसूचना क्र. १५९ दि. ऑक्टोंबर १, २००२ अन्वये स्थापित
[40] अधिसूचना क्र. १९४ दि. एप्रिल ४, २००७ अन्वये स्थापित
[41] अधिसूचना क्र. १७९ दि. ऑक्टोबर ५, २००४ अन्वये स्थापित

मात्र, वरील तारखेपूर्वी स्वीकारलेल्या ठेवीबाबत, अशी अबँकीय वित्तीय कंपनी त्याठेवीच्या तारखेच्या तीन महिन्यांनंतर व अशा ठेवीच्या अटी व शर्तीनुसार परवानगी असल्यास, ठेवीदाराच्या विनंतीवरुन तिचे मुदतपूर्व पुनर् प्रदान करु शकते.

(ब) त्या ठेवीच्या तारखेपासून तीन महिन्यानंतर सार्वजनिक ठेव रकमेच्या पंचाहत्तर टक्के एवढे कर्ज, त्या ठेवीविरुध्द, त्या ठेवीच्या व्याजदरापेक्षा दोन टक्के अधिक दराने ठेवीदाराला देऊ शकते.

**वादग्रस्त अबँकीय वित्तीय कंपनीद्वारा**
**सार्वजनिक ठेवीचे पुनर्प्रदान**

(३) उपपरिच्छेद (१) मधील तरतुदींचे पालन केले असल्यास, ठेवीदाराला त्याच्या तातडीच्या खर्चासाठी, वादग्रस्त अबँकीय वित्तीय कंपनी केवळ पुढील बाबतीतच सार्वजनिक ठेवीचे मुदतपूर्व पुनर्प्रदान करु शकते किंवा तिच्याविरुध्द कर्ज देऊ शकते ;

अ) एखादी छोटी ठेव परत करणे किंवा रु १०,००० पेक्षा अधिक नसलेली सार्वजनिक ठेव परत करणे.

ब) एखाद्या छोट्या ठेवीवर कर्ज देणे किंवा अन्य ठेवींवर रु १०,००० पर्यंतचे कर्ज, त्या ठेवीच्या व्याजदरापेक्षा दोन टक्के अधिक दराने देणे.

[४२] **[वादग्रस्त अबँकीय वित्तीय कंपनीद्वारा ठेवींचे एकत्रीकरण केले जाणे**

(४) वादग्रस्त अबँकीय वुत्तीय कंपनी द्वारा, एकमेव/प्रथम नावाच्या ठेवीदाराच्या नावे त्याच क्षमतेत असलेल्या सर्व ठेवी खाती एकत्रित केली जातील आणि मुदतपूर्व पुनर्प्रदान किंवा कर्ज देण्यासाठी ते केवळ एकच खाते समजले जाईल

**मात्र**, उपपरिच्छेद (१) मधील तरतुदीनुसार, ठेवीदाराचा मृत्यु झाला असल्यास, मुदतपूर्व परतफेडीसाठी हा खंड लागु होणार नाही.]

**सार्वजनिक ठेवींच्या मुदतपूर्व परतफेडीवरील व्याजदर**

एखादी अबँकीय वित्तीय कंपनी, तिच्या स्वतःच्या मताने किंवा ठेवीदाराच्या विनंतीवरुन, ती ठेव स्वीकारल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांनंतर, परंतु परिपक्व होण्यापूर्वी त्या ठेवीचे पुनर्प्रदान करत असेल (ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास करावयाचे मुदतपूर्व पुनर्प्रदान धरुन) तेव्हा पुढील दराने व्याज दिले जावे.

| | |
|---|---|
| ३ महिन्यानंतर परंतु ६ महिन्यांपूर्वी | व्याज नाही |
| ६ महिन्यानंतर परंतु परिपक्वतेच्या तारखे पूर्वी | द्यावयाचे व्याज हे, ती सार्वजनिक ठेव ज्या कालावधीसाठी प्रत्यक्ष राहिली होती तिला त्याच कलाावधीसाठी लागु असलेल्या सार्वजनिक ठेवीला लागु असलेल्या व्याजदरापेक्षा २ टक्क्यांनी कमी दराने किंवा त्या कालासाठी कोणताही व्याजदर ठरविला गेला नसल्यास, ती अबँकीय वित्तीय कंपनी ज्या किमान दराने सार्वजनिक ठेवी स्वीकारतात त्या किमान व्याजदरा पेक्षा ३ टक्क्यांनी कमी |

**स्पष्टीकरण :** ह्या परिच्छेदापुरते,

[४२] अधिसूचना क्र. डीएनबीएस.१८२/(सीजीएम)(पीके)-२००५ दि डिसेंबर ९,२००५ अन्वये स्थापित.

अ) “वादग्रस्त अबँकीय वित्तीय कंपनी” म्हणजे, पुढील प्रमाणे असलेली अबँकीय वित्तीय कंपनी -

१) परिपक्व झालेल्या सार्वजनिक ठेवी परत करण्याबाबतची मागणी कामकाजाच्या पाच दिवसांच्या आत पूर्ण करण्यास नकार देणारी किंवा परत करण्यास असमर्थ असलेली; किंवा

२) एखाद्या छोट्या ठेवीदाराला कोणतीही सार्वजनिक ठेव किंवा तिचा भाग किंवा त्यावरील व्याज परत करण्यामध्ये तिने केलेली कसुरी, कंपनीज् अधिनियम १९५६ च्या कलम ५८अअ खाली सीएलबीला कळविणारी; किंवा

३) तिची ठेवींबाबतची दायित्वे पूर्ण करण्यासाठी, तिच्या लिक्विड ॲसेट सिक्युरिटीज काढून घेण्यासाठी ह्या बँकेकडे येणारी; किंवा

४) नॉन बँकिंग फायनान्शियल कंपनीज् ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिट्स (रिझर्व बँक) निदेश, १९९८ च्या तरतुदींमधून, किंवा सार्वजनिक ठेवींची परतफेड करण्यात किंवा अन्य दायित्वांमध्ये कसुरी टाकण्यासाठी प्रुडेंशियल नॉर्म्समधून सहाय्य किंवा सवलत किंवा सूट मागण्यासाठी ह्या बँकेकडे येणारी; किंवा

(५) ती कंपनी, ह्या बँकेद्वारे, मूलभूत (सुओ मोटो) किंवा, सार्वजनिक ठेवी परत न केल्यामुळे ठेवीदारांच्या तक्रारींवर आधारित किंवा त्या कंपनीच्या धनकोंकडून परतफेड केली जाण्याच्या तक्रारींवर आधारित अशी एक समस्यापूर्ण अबँकीय वित्तीय कंपनी ठरविली गेली आहे.

(ब) छोटेशी ठेव म्हणजे, केवळ एकाच किंवा प्रथम नाव असलेल्या ठेवीदाराच्या, त्याच क्षमतेत, त्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या सर्व शाखांमध्ये असलेल्या सार्वजनिक ठेवींची रु. १०,००० पेक्षा अधिक नसलेली रक्कम. ]

**ठेवीदाराला पावती देणे**

१५(१) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, तिच्या प्रत्येक ठेवीदाराला, किंवा संयुक्त ठेवीदारांच्या गटाला, त्या कंपनीने, ठेव म्हणून स्वीकारलेल्या प्रत्येक रकमेसाठी पावती देईल.

(२) अशा पावतीवर त्या कंपनीने तिच्या वतीने प्राधिकृत केलेल्या अधिका-याची सही असेल व त्यावर ठेवीची तारीख, ठेवीदाराचे नाव, त्या कंपनीने स्वीकारलेली ठेव रक्कम अंकात व शब्दात, त्यावर देय असलेला व्याजदर व त्या ठेवीची परतफेड करावयाची तारीख निर्देशित केली असेल.

मात्र, अशा पावत्या, एखाद्या आवर्ती ठेवीच्या प्रथम हप्त्यानंतरच्या हप्त्यांसाठी असल्यास, त्यावर केवळ त्या ठेवीदाराचे नाव, व ठेवीची रक्कम लिहिली जावी.

**ठेवींसाठी रजिस्टर**

(**१६**)(१) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, सर्व ठेवी संबंधाने एक किंवा अधिक रजिस्टरे ठेवील व त्यात प्रत्येक ठेवीदाराबाबत, वेगवेगळ्या अशा पुढील नोंदी करुन ठेवील

(अ) ठेवीदाराचे नाव व पत्ता
(ब) प्रत्येक ठेवीची तारीख व रक्कम
(क) प्रत्येक ठेवीची मुदत व ड्यु डेट
(ड) प्रत्येक ठेवीवरील उपवर्जित व्याजाची किंवा प्रिमियमची रक्कम व तारीख
(ई) ठेवीदाराने दाखल केलेल्या दाव्याची तारीख
(फ) मुद्दल, व्याज किंवा प्रिमियम बाबत केलेली परताव्याची रक्कम व तारीख
(ग) पाच दिवसांच्यावर परताव्यास विलंब झाल्यास त्याबाबतची कारणे आणि
(ह) त्या ठेवीसंबंधी अन्य कोणताही तपशील.

(२) त्या कंपनीच्या विशिष्ट शाखेने उघडलेल्या ठेवी खात्याबाबत प्रत्येक शाखेने वरील रजिस्टर किंवा रजिस्टरे ठेवावीत आणि त्या कंपनीच्या पंजीकृत कार्यालयात सर्व शाखांचे एकत्रित रजिस्टर ठेवले जावे आणि अशी रजिस्टरे, त्या रजिस्टरांमधील नोंदी ज्यांच्याबाबत आहेत त्या ठेवींची परतफेड किंवा नूतनीकरणाबाबतची शेवटची नोंद केलेल्या आर्थिक वर्षांना किमान आठ कॅलेंडर वर्षे पूर्ण होईपर्यंत सांभाळून ठेवली जावीत.

मात्र, कंपन्या अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २०९ च्या पोटकलम (१) मध्ये संदर्भित अशी लेखा पुस्तके, ती कंपनी, त्या पोटकलमानुसार, तिचे पंजीकृत कार्यालय सोडून दुस-या ठिकाणी ठेवत असल्यास, तसे करणे हे ह्या खंडाचे पुरेसे पालन केले असल्याचे समजले जाईल - मात्र त्याबाबतची अट म्हणजे त्या कंपनीने ह्या पोटकलमाच्या तरतुदीखाली रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे त्याबाबत सादर केलेल्या नोटिसीची एक प्रत, अशा सादरीकरणाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत भारतीय रिझर्व बँकेला सादर करावी.

[४३][**४अ - शाखा व ठेवी गोळा करण्यासाठी एजंट नेमणे :**

जानेवारी १३, २००० रोजी व त्या तारखेपासून, कोणतीही अबँकीय कंपनी, खालील प्रकार सोडून, कोणतीही शाखा उघडणार नाही किंवा ठेवी गोळा करण्यासाठी एजंट नेमणार नाही.

(१) भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा) च्या कलम ४५ - आयएखाली दिलेले पंजीकरण प्रमाणपत्र मिळालेली व ह्या निदेशातील परिच्छेद ४(४) अनुसार सार्वजनिक ठेवी स्वीकारण्याचा अधिकार असलेली, अबँकीय वित्तीय कंपनी, पुढीलप्रमाणे असल्यास तिची शाखा उघडू शकते किंवा एजंट नेमू शकते.

| | |
|---|---|
| (अ) तिचा एनओएफ रु. ५० कोटींपर्यंत आहे | तिचे पंजीकृत कार्यालय असलेल्या राज्यात आणि |
| (ब) तिचा एनओएफ रु. ५० कोटीपेक्षा अधिक असून तिचे क्रेडिट रेटिंग एए किंवा अधिक आहे | भारतीय कोणत्याही ठिकाणी. |

(२)(अ) एखादी शाखा उघडण्यासाठी, अबँकीय वित्तीय कंपनीने, प्रायोजित शाखा उघडण्याच्या उद्देशाबाबत रिझर्व बँकेला अधिसूचित करावे.
(ब) अशी सूचना मिळाल्यानंतर, सार्वजनिक हिताच्या, किंवा संबंधित अबँकीय वित्तीय कंपनीच्या हिताच्या दृष्टीने किंवा नोंद केलेल्या कोण्त्याही संबंधित कारणांसाठी, रिझर्व बँक तो प्रस्ताव फेटाळू शकते आणि त्याबाबत त्या अबँकीय वित्तीय कंपनीला तसे कळवू शकते.

(क) असा प्रस्ताव फेटाळला असल्याबाबत रिझर्व बँकेने दिलेल्या सूचनेच्या तारखेच्या ३० दिवसांच्या आत, प्रस्ताव फेटाळल्याची सूचना रिझर्व बँकेकडून न आल्यास, ती अबँकीय वित्तीय कंपनी, त्या प्रस्तावाबाबत पुढे जाऊ शकते.

**४ब शाखा बंद करणे**

शाखा बंद करण्याच्या नव्वद दिवसांच्या आधी, ती अबँकीय वित्तीय कंपनी, रिझर्व बँकेला तसे कळविल्याशिवाय, तसेच अशा बंद करण्याच्या इराद्याबाबत, राष्ट्रीय स्तरावरावरील कोणत्याही वृत्तपत्रात आणि त्याच ठिकाणी प्रसारित होणा-या भारतीय वृत्तपत्रात, असा इरादा प्रसिध्द केल्याशिवाय तिची शाखा कार्यालय बंद करु शकणार नाही. ]

## विभाग ३ - विशेष तरतुदी

**<u>संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट करावयाची माहिती</u>**

**५-(१)** कंपनीज अधिनियम १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २१७ च्या पोटकलम (१) खालील घेतलेल्या सर्वसाधारण सभेत, संचालक मंडळाच्या, कंपनीसमोर ठेवलेल्या प्रत्येक अहवालात, त्या अबँकीय वित्तीय कंपनीसंबंधीची पुढील माहिती समाविष्ट केली जावी

[४३] अधिसूचना क्र.१३४ दि. जानेवारी १३, २००० अन्वये स्थापित

(१) ठेवीदारांनी हक्क न सांगितलेल्या तसेच ठेवींच्या परताव्याची तारीख उलटली तरीही त्यांचे प्रदान कंपनीने केले नाही अशा, सार्वजनिक ठेवींच्या खात्यांची एकूण संख्या आणि
(२) अशा हक्क न सांगितलेल्या ठेवीखात्यांखालील व परताव्याची तारीख उलटली तरीही कंपनीने प्रदान केले नाही अशा ठेवीखात्यांखाली देय असलेली एकूण रक्कम कलम (१) मध्ये सांगितल्या प्रमाणे

(२) वरील तपशील किंवा माहिती ही, त्या अहवालाशी संबंधित आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी असलेल्या स्थितीसंबंधाने दिली जावी आणि वरील पोट-परिच्छेदाच्या खंड (२) मध्ये संदर्भित असलेल्या, बिनहक्काच्या किंवा परतावा न केलेल्या ठेवींची रक्कम, रु. पाच लाखांपेक्षा अधिक असल्यास, बिनहक्काच्या किंवा परतावा न केलेल्या रकमा परत करण्यासाठी संचालक मंडळ कोणती पावले उचलणार आहे ह्याचे निवेदनही त्या अहवालात दिले जावे.

**मंजुरीप्राप्त प्रतिभूतींचा सुरक्षा-सांभाळ (सेफ कस्टडी)**

[४४][**६**(१) प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी

(१) एखाद्या अनुसूचित वाणिज्य बँकेत किंवा स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एसएचसीआयएल) मध्ये एक कन्स्टिट्युएंट्स सबसिडिअरी लेजर (सीएसजीएल) खाते उघडील किंवा सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कंट्रोल बोर्ड ऑफ इंडिया मध्ये नोंदणीकृत डिपॉझिटरी सभासदामार्फत एखाद्या डिपॉझिटचे ट मध्ये एक डिमॅट खाते उघडील आणि भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५-आयबीअन्वये आणि अधिसूचना क्र. डीएफसी १२१/ईडी (जी) ०८ दि. जानेवारी ३१, १९०८ अनुसार ठेवणे आवश्यक असल्यानुसार, त्या सीएसजील खात्यात किंवा डिमॅट खात्यात बोजा नसलेल्या मंजुरीप्राप्त सिक्युरिटीज ठेवील.

(२) त्या अबँकीय वित्तीय कंपनीचे पंजीकृत कार्यालय असलेल्या ठिकाणी एका अनुसूचित वाणिज्य बँकेची, नेमलेला बँकर म्हणून नेमणुक करील आणि अशा बँकेला किंवा एसएचसीआयल बँकेकडे, अधिसूचना क्र. डीएफसी.१२१/ईडी(जी)-९८ दि. जानेवारी ३१, १९९८ अन्वये त्या कंपनीने ठेवलेल्या विना-बोजाच्या व डिमटेरियलाईज्ड न झालेल्या मंजुरीप्राप्त सिक्युरिटिजचा प्रत्यक्ष स्वरुपात ताबा देईल.

आणि ह्यामधील सेकंड शेड्युलमध्ये विहित केल्यानुसार, तिने सीएसजीएल खाते उघडले असलेल्या किंवा प्रत्यक्ष स्वरुपात सिक्युरिटीज ठेवल्या असलेल्या बँकेचे किंवा तिने सीएसजीएल खाते उघडले असलेल्या किंवा प्रत्यक्ष स्वरुपात सिक्युरिटीज ठेवलेल्या एसएचसीआयएलचे, किंवा तिने डिमॅट खाते ठेवलेल्या डिपॉझिटरीचे (आणि डिपॉझिटरी सभासदाचे) नाव व पत्ता, त्या कंपनीचे पंजीकृत कार्यालय, रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या कार्यालयाला, लेखी स्वरुपात कळवील.
मात्र, जेथे, एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीने, वरील खंड (२) मध्ये विहित केलेल्या सिक्युरिटीज, नेमलेल्या बँकेकडे किंवा तिचे पंजीकृत कार्यालय असलेली जागा सोडून अन्य ठिकाणी असलेल्या एसएचसीआयएकडे सुपुर्द करावयाचे ठरविल्यास, ह्यामधील सेकंड शेड्युलमध्ये विहित केल्यानुसार, त्या कंपनीचे पंजीकृत कार्यालय, रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राखाली येते त्या कार्यालयाची लेखी पूर्व परवानगी घेऊन ती तसे करु शकते.]

[४५][मात्र, ह्याशिवाय, वरील सीएसजील खात्यात किंवा डिमॅट खात्यात ठेवलेल्या सरकारी सिक्युरिटीजचे, रेडी फॉरवर्ड कॉंट्रॅक्ट (रिव्हर्स रेडी फॉरवर्ड कॉंट्रॅक्टसह) करुन किंवा अन्य प्रकारांनी, पुढे दिलेल्या रीतींशिवाय ट्रेडिंग करता येणार नाही.]

[46][ (२)वरील उपपरिच्छेद(१) मध्ये निर्देशित केलेल्या सिक्युरिटिज, ठेवीदारांच्या हितासाठी, त्यातच ठेवल्या जाणे सुरुच राहील आणि रिझर्व बँकेची पूर्व परवानगी घेतल्यावर त्या ठेवीदाराला पुनरप्रदान करण्याची बाब सोडल्यास, त्या अबँकीय वित्तीय कंपनीद्वारे त्यांची निकासी किंवा रोखीकरण केले जाणार नाही किंवा अन्य प्रकारे हाताळल्या जाणार नाहीत :

[44] अधिसूचना क्र. १५९ दि. ऑक्टोबर १, २००२ अन्वये प्रतिस्थापित
[45] अधिसूचना क्र. १७० दि. जुलै ३१, २००३ अन्वये स्थापित.
[46] अधिसूचना क्र. १५९ दि. ऑक्टोबर १, २००२ अन्वये प्रतिस्थापित

मात्र,

(१) एखादी अबँकीय वित्तीय कंपनी, तिच्या ऑडिटरने त्याबाबत दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर, सार्वजनिक ठेवी कमी झाल्याच्या प्रमाणात, अशा सिक्युरिटीजचा काही भाग काढून घेऊ शकते.

(२) जेथे, अबँकीय वित्तीय कंपनी, प्रत्यक्ष स्वरुपात ठेवलेल्या सिक्युरिटीज बदलू (सबस्टिट्युट) इच्छित असल्यास, त्या सिक्युरिटीज काढण्यापूर्वी, त्या नेमलेल्या बँकेला किंवा एसएचसीआयएलला त्याच मूल्याच्या सिक्युरिटीज देऊन तसे करु शकते आणि ]

(३) [47][ह्या सिक्युरिटीजचे बाजारमूल्य, कोणत्याही वेळी, अधिसूचना क्र. डीएफसी.१२७/ईडी(जी).९८ दि. जानेवारी ३१, १९९८ मध्ये विहित केल्याप्रमाणे सार्वजनिक ठेवींच्या टक्केवारीपेक्षा कमी असू नये ]

[48][(३) जेथे, ह्या अधिनियमाच्या कलम ४५-आयबीखाली व अधिसूचना क्र. डीएफसी.१२१/ईडी(जी)-९८ दि. जानेवारी ३१, १९९८ अनुसार ठेवावयाच्या आवश्यकतेपेक्षा अधिक असलेल्या सरकारी सिक्युरिटीजमध्ये, रेडी फॉरवर्ड कॉंट्रॅक्ट (रिव्हर्स रेडी फॉरवर्ड कॉंट्रॅक्टसह) किंवा अन्य प्रकाराने ट्रेडिंग करण्यास ती एनबीएफसी इच्छुक असल्यास, अशा अतिरिक्त असलेल्या सरकारी सिक्युरिटीज एक वेगळेच सीएसजीएल खाते किंवा डिमॅट खाते उघडून ती तसे करु शकते. ]

**कर्मचा-यांची सुरक्षा ठेव**

(७) एखाद्या अबँकीय वित्तीय कंपनीने, तिच्या नेहमीच्या व्यवहारानुसार, तिच्या कोणत्याही कर्मचा-याकडून त्याच्या कामगिरीबाबत सुरक्षा ठेव म्हणून कोणतीही रक्कम मिळाल्यास, तिने अशी रक्कम, ती कंपनी व तो कर्मचारी ह्यांच्या संयुक्त नावाने एखाद्या वाणिज्य बँकेत किंवा पोस्ट ऑफिसात पुढील शर्तीवर ठेवावी

(१) कर्मचा-याच्या लेखी संमतीशिवाय तिने ती रक्कम काढू नये आणि

(२) कर्मचा-याला त्याची कर्तव्ये पार पाडण्यामध्ये अपयश आल्यामुळे कंपनीद्वारे कापली जाणारी रक्कम सोडल्यास अशा ठेव रकमेवरील व्याजदर ती रक्कम त्या कर्मचा-याला परत दिली जाईल.

**रिझर्व बँकेला सादर करावयाच्या, ताळेबंद व लेखा, ह्यासह**
**संचालकांचा व ऑडिटर्सचा अहवाल,**
**नोट्स ऑन अकाऊंट्स व रिर्टन्सच्या प्रती सादर करणे**

**ऑडिटरचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तरतुद**

८(१) सार्वजनिक ठेवी ठेवणारी/स्वीकारणारी प्रत्येक अबँकीय वित्तीय कंपनी, प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तारखेस असलेला ऑडिटेड ताळेबंद, त्या कंपनीच्या सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या त्या वर्षाच्या ऑडिटेड नफा-तोटा लेखेच्या प्रतीसह, कंपनीज अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २१७ (१) अनुसार अशा सभेमध्ये कंपनी समोर ठेवलेल्या संचालक मंडळाच्या अहवालाची एक प्रत, व तिच्या ऑडिटरने दिलेल्या अहवालाची व नोट्स टु अकाऊंट्सची एक प्रत, अशी सभा झाल्यावर १५ दिवसांच्या आत रिझर्व बँकेला सादर करील.

[47] खंड (३) काढून टाकण्यात आला व खंड (४) पुनरांकित केला गेला - अधिसूचना क्र. १७० दि. जुलै ३१, २००३.
[48] अधिसूचना क्र. १७० दि. जुलै ३१, २००३ अन्वये स्थापित.

(२) सार्वजनिक ठेवी स्वीकारणा-या/ठेवणा-या प्रत्येक एनबीएफसाने रिझर्व बँकेकडे, वरील परिच्छेद (१) मध्ये दिल्यानुसार ऑडिट केलेल्या ताळेबंदाच्या प्रतीसह, ऑडिटर्सनी संचालक मंडळाला दिलेल्या अहवालाची प्रत व ह्या ताळेबंदात, ह्या कंपनीच्या ठेवीदारांबाबत असलेल्या जबाबदा-यांची, त्यावरील देय असलेल्या व्याजांसह असलेली रक्कम योग्य प्रकारे प्रदर्शित होत आहे आणि ठेवीदारांबाबतच्या अशा जबाबदा-यांची रक्कम देण्यास ही कंपनी सक्षम आहे असे ऑडिटर्सचे प्रमाणपत्र सादर करावे.

**<u>भारतीय रिझर्व बँकेला सादर करावयाचे अहवाल</u>**

(३) सार्वजनिक ठेवी स्वीकारणारी/ठेवणारी प्रत्येक एनबीएफसी, रिझर्व बँकेला, ह्यामधील फर्स्ट शेड्युल मध्ये विहित केलेल्या तारखेस तिच्या आर्थिक स्थिती --- संदर्भाने अहवाल सादर करील.

[४९] “मात्र, जून ३०, २०११ पासून, असा अहवाल तीन महिन्यांनी, ती तिमाही संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत, https://cosmos.rbi.org.in वर उपलब्ध असलेल्या नमुन्यात ऑनलाईन सादर करावयाचा आहे.

(४) पुढील बाबतीत काही बदल झाल्यास असा बदल झाल्यापासून एक महिन्याच्या आत, प्रत्येक एनबीएफसी, रिझर्व बँकेला कळवील.

(१) पंजीकृत/कॉर्पोरेट ऑफिसचा संपूर्ण पोस्टल पत्ता, टेलिफोन/फॅक्स नंबर
(२) कंपनीच्या संचालकांची नावे व निवासी पत्ता
(३) तिच्या प्रमुख अधिका-यांची नावे व अधिकृत हुद्दे.
(४) त्या कंपनीच्या वतीने सही करण्यास प्राधिकृत असलेल्या अधिका-यांच्या नमुना-सह्या
(५) त्या कंपनीच्या ऑडिटर्सची नावे व पत्ते

**<u>नॉन-बँकिंग पर्यवेक्षण विभागाला सादर करावयाचे</u>**
**<u>ताळेबंद, अहवाल इत्यादि</u>**

(५) ह्या निदेशांचे पालन करण्यासाठी रिझर्व बँकेला सादर करावयाचे ताळेबंद, अहवालाची माहिती किंवा सूचना, ह्यातील सेकंड शेड्युलमध्ये विहित केल्यानुसार, त्या कंपनीचे पंजीकृत कार्यालय, रिझर्व बँकेच्या ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येते त्या कार्यालयाकडे सादर केले जावेत.

**<u>काही प्रकारच्या अबँकीय वित्तीय कंपन्यांना हे निदेश लागु न होणे</u>**

(९) ह्या नेदेशांच्या परिच्छेद ४ ते ८मध्ये दिलेले काहीही पुढील बाबतीत लागु होणार नाही :

(१) विमा अधिनियम, १९३८ (१९३८ चा ४) च्या कलम ३ खाली दिलेले वैध पंजीकरण प्रमाणपत्र असलेली विमा कंपनी, किंवा सिक्युरिटीज कॉंट्रॅक्ट्स (विनियम) अधिनियम १९५६ (१९५६ च्या ४२) च्या कलम ४ खाली अधिसूचित स्टॉक एक्सचेंज, किंवा सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया अधिनियम, १९९२ (१९९२ चा १५) च्या कलम १२ मध्ये व्याख्या केलेली स्टॉक ब्रेकिंग कंपनी ;

(२) एखादी कर्जदायी कंपनी, गुंतवणुक कंपनी, कोणतेही सार्वजनिक ठेव <u>न स्वीकारणारी/धारण</u> करणारी ॲसेट फायनान्स कंपनी [५०].

(३) अशी गुंतवणुक कंपनी

(१) जिने केवळ तिच्या स्वतःचा गट/होल्डिंग/दुय्यम कंपन्या ह्यांचेच शेअर्स/सिक्युरिटीज प्राप्त केल्या असून कोणत्याही वेळी अशी प्राप्ती एकूण ॲसेट्सच्या नव्वद टक्क्यांपेक्षा कमी नाही.

(२) जी शेअर्स/सिक्युरिटीज मध्ये ट्रेडिंग करत नाही आणि

(३) जी सार्वजनिक ठेवी स्वीकारत/धारण करत नाही.

[४९] अधिसूचना क्र. डीएनबीएस २३०/सीजीएम (युएस) २०११ दि. सप्टेंबर २२, २०११ अन्वये

[५०] अधिसूचना क्र. १८९ दि. डिसेंबर ६, २००६ अन्वये प्रतिस्थापित.

मात्र, हे निदेश दिले गेल्याच्या तीस दिवसांच्या आत, व त्यानंतर प्रत्येक आर्थिक वर्ष सुरु झाल्याच्या ३० दिवसांच्या आत, तिच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये ठराव पारित करुन घ्यावा की, त्या कंपनीने तिच्या स्वतःच्या गट/होल्डिंग/दुय्यम कंपन्यांच्या शेअर्स/सिक्युरिटीजमध्ये, तिच्या ॲसेट्सच्या ९०% गुंतविले आहेत किंवा गुंतविणार आहे आणि (प्रत्येक कंपनीचे नाव विहित करावे) ती अशा शेअर्स/सिक्युरिटीजमध्ये ट्रेडिंग करणार नाही व तिने त्या वर्षात कोणतीही सार्वजनिक ठेव स्वीकारलेली नाही व ती स्वीकारणारही नाही.

[५१][**९.अ** - वरील परिच्छेद ४ ते ७ मध्ये दिलेले काहीही, कंपनी अधिनियम १९५६ (१९५६ चा १) च्या कलम ६१७ खाली व्याख्या केलेल्या व एक सरकारी कंपनी नसलेल्या एनबीएफसीला लागु होणार नाही.]

**सूट**

(१०) भारतीय रिझर्व बँक, अडचणी/त्रास टाळण्यासाठी तिला आवश्यक असल्याचे वाटल्यास किंवा अन्य कोणत्याही न्याय्य व पुरेशा कारणासाठी, तिने घातलेल्या अटी व शर्तींवर, ह्या निदेशातील कोणत्याही किंवा सर्व तरतुदींचे, सर्वसाधारणतः किंवा कोणत्याही विहित कालावधीसाठी पालन करण्याबाबत मुदतवाढ देऊ शकते किंवा एखाद्या कंपनीला किंवा कंपन्यांच्या कोणत्याही वर्गाला देऊ शकते.

**नॉन बँकिंग वित्तीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, १९९८ चा भंग/उल्लंघन केले जाण्यामुळे केलेली किंवा करावयाची कारवाई वाचविणे**

(११) येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, अधिसूचना क्र.डीएफसी.११४/डीजी (एसपीटी)९८ दि.जानेवारी २, १९९८ मध्ये दिलेल्या नॉन बँकिंग वित्तीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, १९९८ रद्द झाल्यामुळे पुढील बाबींवर परिणाम होणार नाही

(१) त्याखालील कोण्ताही हक्क, दायित्व किंवा मिळालेली, आलेली किंवा जमा झालेली जबाबदारी;

(२) त्याखाली केलेल्या कोण्त्याही भंग/उल्लंघना संबंधाने झालेला किंवा आलेला दंड, जप्ती किंवा शिक्षा; आणि

(३) ह्या निदेशांखाली निर्माण झालेला असा हक्क, दावा, दायित्व, जबाबदारी, दंड, जप्ती किंवा शिक्षा ह्यांबाबतची चौकशी, कायदेशीर प्रक्रिया किंवा कारवाई,

हे निदेश रद्द झालेच नाहीत अशा प्रकारे कोणतीही चौकशी, कायदेशीर प्रक्रिया किंवा कारवाई लागु किंवा सुरु किंवा जारी केली जाऊ शकते आणि असा दंड किंवा शिक्षा केली जाऊ शकते.

**परिच्छेद २(१) मध्ये निर्देशित केलेल्या कंपन्यांव्यतिरिक्त अन्य कंपन्यांना हे निदेश लागु होणे**

**१२.** सध्या जारी असलेल्या ह्या निदेशांमधील तरतुदी, एक वित्तीय कंपनी असूनही, ह्या निदेशातील परिच्छेद २ मधील उपपरिच्छेद (१) मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही वर्गात नसलेल्या किंवा संकीर्ण अबँकीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, १९७७ च्या व्याप्तीमध्ये असलेली, संकीर्ण अबँकीय कंपनी नसलेल्या किंवा अवशिष्ट (रेसिड्युअरी) अबँकीय कंपन्या (रिझर्व बँक) निदेश, १९८७ च्या अर्थाखाली नसलेल्या अवशिष्ट अबँकीय कंपनी नसलेल्या कंपनीला लागु होतील. कारण ते निदेश एखाद्या कर्जदायी कंपनीला किंवा कर्जदायी कंपनीच्या संबंधात लागु होतात.

सही/-

(एस पी तलवार)
उप-गव्हर्नर

[५१] अधिसूचना क्र. १३४ दि. जानेवारी १३, २००० अन्वये स्थापित.

**दुसरे शेड्युल**
**(कृपया निदेशाचा परिच्छेद ६(१) बघा)**
रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या प्रत्येक प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राखालील क्षेत्र.

| अनुक्रमांक | कार्यालयाचा नाव व पत्ता | एरिया अंडर ज्युरिडिक्शन |
|---|---|---|
| १. | अहमदाबाद विभागीय कार्यालय<br>ला गज्जार चेंबर्स<br>आश्रम रोड<br>अहमदाबाद-३८०००९ | गुजरात राज्य आणि संयुक्त<br>दमण आणि दीव चा भाग<br>आणि दादरा नगर हवेली |
| २. | बंगलोर विभागीय कार्यालय<br>१०-३-८ नृपाथुंगा रोड<br>बंगलोर-५६०००२ | कर्नाटक राज्य |
| ३. | भोपाळ विभागीय कार्यालय<br>होशंगाबाद रोड<br>पोस्ट बॉक्स क्र.३२<br>भोपाळ-४६२०११ | [५२] (मध्यप्रदेश राज्य आणि छत्तीसगड) |
| ४. | भूबनेश्वर विभागीय कार्यालय<br>पंडीत जवाहरलाल नेहरू,<br>पोस्ट बॅक क्र.१६,<br>भूबनेश्वर ७५१ ००१ | ओरिसा राज्य |
| ५. | [५३](कोलकत्ता) विभागीय ऑफिस<br>नेताजी सुभाष रोड<br>[५४](कोलकत्ता) ७०० ००१ | सिक्कीम राज्य आणि पश्चिम बंगाल आणि संयुक्त भाग ऑफ अंदमान आणि निकोबार बेट |
| ६. | चंदीगढ विभागीय कार्यालय<br>११, केंद्रीय विस्ता<br>नवीन कार्यालयाची इमारत<br>टेलिफोन भुवनाच्या विरुध्द दिशेला<br>सेक्टर १७<br>चंदीगढ-१६० ०१७ | हिमाचल प्रदेश राज्य<br>पंजाब आणि संयुक्त<br>चंदीगढ चा भाग |
| ७. | चेन्नई विभागीय कार्यालय<br>फोर्ट ग्लासिक्स,<br>राजाजी सलाई,<br>चेन्नई-६०० ००१ | तामिळनाडू राज्य आणि संयुक्त<br>पॉडेचेरी चा भाग |
| ८. | गुवाहटी विभागीय कार्यालय,<br>स्टेशन रोड पान बाजार<br>पोस्ट बॉक्स क्र.१२०,<br>गुवाहटी-७८१ ००१ | अरुणाचल प्रदेश राज्य<br>आसाम, मणिपुर मेघालय<br>मिझोराम, नागालँड,आणि त्रिपुरा |
| ९. | हैद्राबाद विभागीय कार्यालय ६-१-५६ सिक्रेटॅरंट रोड, सैफाबाद, हैद्राबाद-५०० ००४ | आंध्रप्रदेश राज्य |
| १०. | जयपुर विभागीय कार्यालय<br>राम बाग सर्कल<br>टोंक रोड पी बी.क्र.१२<br>जयपूर-३०२ ००४ | राजस्थान राज्य |
| ११ | जम्मू विभागीय कार्यालय<br>रेड हेड कॉप्लेक्स<br>पोस्ट बॅग क्र.१,<br>जम्मु-१८० ०१२ | जम्मू आणि काश्मीर राज्य |

| | | |
|---|---|---|
| १२. | [५५] (कानपुर विभागीय कार्यालय<br>महात्मा गांधी मार्ग, कानपुर-२०८ ००१) | [२९] (उत्तर प्रदेश आणि उत्तरांचल राज्य) |
| १३. | मुंबई विभागीग कार्यालय,<br>गारमेंट हाउस,<br>४ था मजला, डॉ. ॲनी बेजंट मार्ग,<br>वरळी, मुंबई-४०० ०१८ | गोवा आणि महाराष्ट्र राज्य |
| १४. | न्यू दिल्ली विभागीय कार्यालय<br>६, संसद मार्ग,<br>न्यू दिल्ली-११० ००१. | हरयाणा राज्य आणि दिल्ली राजधानी राज्यक्षेत्र |
| १५. | पटणा विभागीय कार्यालय<br>गांधी मैदानाचा दक्षिण भाग<br>पोस्ट बॅग क्र.१६२,<br>पटणा -८०० ००१. | २९[बिहार आणि झारखंड राज्य] |
| १६. | तिरुअनंतपुरम विभागीय कार्यालय,<br>बेकरी जंक्शन,<br>तिरुअनंतपुरम -६९५ ०३३.<br>५२ अधिसूचना क्र. १४८ दि. जून २७, २००१ अन्वये प्रतिस्थापित | लक्षद्वीप राज्यक्षेत्र |

[५२] अधिसूचना क्र. १४८ दि. जून २७, २००१ अन्वये स्थापित.
[५३] अधिसूचना क्र. १४८ दि. जून २७, २००१ अन्वये स्थापित.
[५४] अधिसूचना क्र. १४८ दि. जून २७, २००१ अन्वये स्थापित.
[५५] अधिसूचना क्र. १४८ दि. जून २७, २००१ अन्वये स्थापित.